# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील ग्रामीण भागातील गावांच्या गावठणाची हद्द वाढविण्यातबाबत**

**(१) ५२९० (२७-०१-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील सर्व गावातील गावठणाची हद्द मागील काही वर्षापासून वाढविण्यात आली नसल्यामुळे ग्रामस्थांची गावठाणाची हद्द वाढविण्याबाबत संबंधितांकडे वारंवार मागणी करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ग्रामीण भागातील गावांच्या गावठाणाची हद्द वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१-११-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) गावठाण विस्तार योजनेच्या अंमलबजावणीसाठी वेळोवेळी शासन निर्णय व परिपत्रकाद्वारे आदेश देण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णय/ आदेश एकत्रित करुन, महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक दि.१०/२/१९८३ अन्वये गावठाण विस्तार कार्यक्रम राबविण्याबाबतची कार्यपध्दती विषद करण्यात आलेली आहे. त्यानुसार गावठाण विस्तार योजना या जिल्हास्तरीय योजनेअंतर्गत गावठाण विस्तार करण्यासाठी निर्णय घेण्याचे अधिकार, जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. तसेच महसूल व वन विभाग शासन निर्णय दि.१९/३/२०१२ अन्वये, गावठाण विस्तार योजनेतील प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित उप विभागीय अधिकारी यांची मिळून एक त्रिस्तरीय सदस्य समिती गठित करण्यात आली आहे. प्रत्येक

जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या या समितीने जिल्ह्यातील गावठाण विस्तार योजनेतील प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन कालबध्द पध्दतीने मोहिम हाती घेण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वाशिम येथील शेतकऱ्यांने केलेली आत्महत्या

**(२) २९९५३ (१८-०१-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.विजय भांबळे (जिंतूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील भीषण दुष्काळासह अवकाळी पाऊस अशा कारणांमुळे वाशिम येथील श्री.आत्माराम लांडगे या शेतकऱ्यांने मा.मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून आपले जीवन संपविले असल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील शेतकरी निराश झाला असूनही शासन आवश्यक कार्यवाही करीत नसल्याचे राज्यातील आधिकाधिक शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होत आहेत हे पाहता शासन आवश्यक कार्यवही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-१०-२०१८) :** (१) मृतक दत्ता आत्माराम लांडगे, वय ३० वर्षे, रा.जऊळका, ता.मालेगांव यांनी दिनांक १०.०९.२०१५ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे. सदर प्रकरण जिल्हास्तरीय समितीने पात्र ठरविले असून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या वारसास रु.१.०० लक्ष ची मदत देण्यात आलेली आहे. तसेच मृतकाच्या पत्नीला, मग्रारोहयो, जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम येथे कंत्राटी पदावर मदतनीस म्हणून नियुक्ती देण्यात आली.
(२) कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन अंतर्गत सर्व गरजू शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा योजना व राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ देण्यात येत आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांच्या मुलांना मोफत शिक्षणाची योजना तसेच शेती विकासासंदर्भात सर्व विभागाकडील शासकीय योजना जिल्ह्यात राबविण्यात येत आहेत. शेतकऱ्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, वाशिम कार्यालयामार्फत “मिशन प्रेरणा” राबविण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी “अन्नदाता प्रबोधन संकल्प सभा” आयोजित करण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हा दुष्काळ जाहीर करण्याबाबत

**(३) ३४३९९ (२७-०१-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात सन २०१५ - २०१६ च्या खरीप हंगामात कमी - जास्त पाऊस पडल्यामुळे यंदा ५० टक्के पिकांचे उत्पादन झाले असल्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यात दुष्काळ सदृष्य परिस्थिती निर्माण झालेली असताना राज्यातील सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील पिकांची हंगामी पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी असलेल्या १४७०८ गावामध्ये दुष्काळ सदृष्य परिस्थिती राज्य शासनाने २० आक्टोंबर २०१५ रोजीच्या आदेशान्वये जाहीर केले त्यामध्ये चंद्रपूर जिल्ह्याचा समावेश नसल्याची माहिती दिनांक २६ आक्टोंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, मागील ५ वर्षाच्या कालावधीतील उत्पन्नाची सरासरी हे प्रमाण उत्पन्न समजून ६७ पैशापेक्षा कमी आणि ६७ पैशापेक्षा जास्त पैसेवारी आलेली गावांची यादी १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे पाठविण्यात यावी याबाबत शासनाने बैठक २०१५/प्र.क्र.३०८/म-८ महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई या आदेशांनुसार दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास परिपत्रक काढून महसूल विभागाकडून यादया मागविल्या होत्या, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, शासनाकडे यादया प्राप्त होताच त्याबाबतचा शासनाने बैठक २०१५/प्र.क्र.३०८/म-८ महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई या आदेशांनुसार दि १६ सप्टेंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास काढलेले परिपत्रक काही दिवसानंतर रद्द करून दुष्काळा संबंधातील ५० पैशापेक्षा कमी आणि ५० पैशापेक्षा जास्त पैसेवारी चा आदेश कायम ठेवण्यात आले, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यामध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आले आहे काय वा करण्यात येणार आहे

(५) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे काय,

(६) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-१०-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) महसुल व वन विभाग शासन निर्णय दिनांक २३ मार्च, २०१६ अन्वये सन २०१५-१६ च्या खरीप हंगामात चंद्रपूर जिल्ह्यातील ५० पैशांपेक्षा कमी अंतिम पैसेवारी असलेल्या १६६३ गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली होती.

(५) दिनांक २३ मार्च २०१६ च्या शासन निर्णयान्वये चंद्रपूर जिल्ह्यातील ५० पैशांपेक्षा कमी अंतिम पैसेवारी असलेल्या १६६३ गावांमध्ये शासनाच्या दिनांक २०.१०.२०१५ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आलेल्या खालील सवलती लागू करण्यात आल्या होत्या.

१) जमीन महसूलात सुट

२) कृषि पंपाच्या चालू वीज देयकात ३३.५% इतकी सुट

३) शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी

४) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टॅंकर्सचा वापर

५) दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

तसेच दि. २२/४/२०१६ च्या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे अतिरिक्त दोन सवलती लागू करण्यात आल्या होत्या.

६) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती

७) सहकारी पिक कर्जाचे पुनर्गठन

(६) प्रश्न उद्भवत नाही

---

**रत्नागिरी जिल्हयातील पिकांचे निर्धारण करुन पैसेवारी काढण्यासह जिल्हा दुष्काळग्रस्त जाहिर करण्याबाबत**

**(४) ३४७९६ (१५-०१-२०१७). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणामधील दुष्काळग्रस्त भागातील पैसेवारी काढताना त्यात अधिक अचूकता आणण्यासाठी नुकसानीचे प्रत्यक्ष अनुमान लावण्यासाठी नजर पैसेवारीच्या पारंपारिक पद्धतीत बदल करण्यात येईल असे शासनाने घोषित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे ऑगस्ट, सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने आदेश काढून पारंपारिक पद्धतीने नजर पैसेवारी काढण्याचे निश्चित केले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यात कमी पाऊस झाल्याने दुष्काळाने जिल्ह्यातील शेतकरी होरपळत असतांना नजर पैसेवारी ५० पैशापेक्षा जास्त न दिल्याने रत्नागिरी जिल्हा दुष्काळग्रस्तामधून वगळणार हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती रत्नागिरी जिल्ह्यातील पिकाचे अचूक निर्धारण करुन पैसेवारी काढण्याबाबत व जिल्ह्याला दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करुन शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१८) :** (१) व (२) महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय-२०१३/प्र.क्र.२०७/म-७ दिनांक ३ नोव्हेंबर, २०१५ अन्वये पीक पैसेवारीबाबत सुधारित आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(३) सन २०१५-१६ च्या खरीप हंगामात रत्नागिरी जिल्ह्यातील १५१३ गावांची पैसेवारी जाहीर करण्यात आली होती. १५१३ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा जास्त असल्याने रत्नागिरी जिल्ह्यामध्ये दुष्काळ घोषित करण्यात आलेला नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुंटुंबातील वारसांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(५) ५५१०० (१५-०५-२०१७). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये दिनांक १ जानेवारी, २०१५ ते ३१ मे, २०१६ या कालावधीत किती व्यक्तींनी आत्महत्या केल्या आहेत,
(२) मौजे मांजरवाडी व चिंचणी (ता.खटाव, जि.सातारा) येथील शेतक-यांने गतवर्षी पावसाअभावी खरीप व रब्बी हंगाम घेता न आल्यामुळे तसेच कर्जबाजारीपणाला कंटाळून माहे मे,२०१६ रोजी वा त्यादरम्यान आत्महत्या केली हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती मृत शेतक-यांच्या कुटुंबातील वारसांना मदत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१८) :** (१) सोलापूर जिल्हयामध्ये दि.१ जानेवारी, २०१५ ते मे, २०१६ या कालावधीत एकूण ६० शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. मात्र शासन निर्णय, दिनांक २३ जानेवारी, २००६ मधील निकषानुसार मदतीस पात्र ठरलेल्या ६ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी रु.१ लाख इतकी मदत देण्यात आली आहे.
(२) मांजरवाडी व चिंचाणी येथील दोन व्यक्तींनी आत्महत्या केली हे खरे आहे.
(३) व (४) होय,

तालुकास्तरीय कमिटीमार्फत चौकशी करण्यात आली असून जिल्हास्तरीय समितीमध्ये अंतिम निर्णय घेण्यात आलेला आहे.

सोलापूर जिल्हयातील पात्र असलेल्या ६ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना शासन निर्णय, दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये रु.१ लाख इतकी तातडीने मदत देण्यात आली आहे.

सातारा जिल्हयातील मौजे मांजरवाडी, ता.खटाव येथील कै.दत्तात्रय काशीनाथ भोसले यांनी दि.०९/०५/२०१६ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. मयताचे वारस त्यांची पत्नी श्रीमती अंजली दत्तात्रय भोसले यांना रु.१ लाखाची मदत देण्यात आली आहे.

मौजे चिंचणी, ता.खटाव येथील कै.संदीप राऊ जाधव यांनी दि.२६/०५/२०१८ रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. सदर व्यक्तीच्या नावे कोणतेही क्षेत्र अथवा जमीन नसल्याने तसेच कोणत्याही प्रकारचे कर्ज नसल्याने प्रकरण जिल्हास्तरीय समितीने अपात्र ठरविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद व यवतमाळ या जिल्ह्यात पथदर्शी तत्वावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत

**(६) ५८५४६ (१५-०५-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मागील ३-४ वर्षातील दुष्काळ, गारपीट, अवकाळी पाऊस इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी दिनांक २४ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास उस्मानाबाद व यवतमाळ या जिल्ह्यात पथदर्शी तत्वावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विशेष मदतीचा कार्यक्रम राबविण्याचा शासन निर्णय काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शासन निर्णयानुसार राज्य शासनाकडून प्रत्येक ग्रामस्तरीय समितीस रु. १.०० लक्ष ठोक रक्कम देण्याचे ठरले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यात गावाच्या लोकसंख्येचा विचार न करता सरसकट १ लाख रुपये देण्याचे कारण काय,

(४) असल्यास, लोकसंख्येचा विचार करून ग्रामस्तरीय समितीस आणखीन वाढीव निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-१०-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) पथदर्शी प्रकल्पांसाठी यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यांची निवड केली असून त्याअंतर्गत ग्रामस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. प्रत्येक ग्रामस्तरीय समितीस रू.१.०० लक्ष निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लोकसंख्येचा विचार करून ग्रामस्तरीय समितीस वाढीव निधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्ह्यातील जनावरांसाठी पाणीपुरवठा करण्याबाबत

**(७) ६२५७७ (१६-०५-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात पाण्याच्या टंचाईमुळे पाण्याची मागणी वाढली असून माणसांप्रमाणेच जनावरांसाठी पाण्याच्या वाढीव खेपांसाठी तहसिलदारांकडे प्रस्ताव पाठविले जात असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनावरांसाठी पाण्याची मागणी नोंदवितांना पशुधन विकास अधिकाऱ्यांनी संबंधित ठिकाणच्या जनावरांच्या संख्या, पाण्याची गरज याबाबतचे प्रमाणपत्र पाणी मागणी प्रस्तावात देण्याच्या सूचना जिल्हा परिषदेने केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जनावरांच्या पाण्यासाठी टँकरच्या खेपा प्रक्रियेत अधिक सुलभता आणून सदर प्रस्तावांना मंजूरी देऊन जनावरांसाठी पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-१०-२०१८) :** (१) व २) होय.

(३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय दिनांक २७ ऑगस्ट, २००९ मधील तरतूदीनुसार राज्यातील/वाडीतील लोकसंख्येबरोबरच पशुधनास लागणाऱ्या पिण्याच्या पाण्याची गरज विचारात घेऊन कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यातील पुरग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत

**(८) ६७९२७ (१५-०५-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील सन २००७ मधील पुरग्रस्तांच्या पुनर्वसनाकररिता रु. ४० कोटी निधी मंजूर करुन त्वरीत पुनर्वसन करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.राज्यमंत्री, उद्योग व खनिकर्म, सार्वजनिक बांधकाम यांच्याकडे दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.राज्यमंत्री, उद्योग यांनी उक्त निवेदन पुढील कार्यवाहीसाठी मा.मंत्री, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मदत व पुनर्वसन विभागाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१-११-२०१८) :** (१) हे खरे नाही, अमरावती जिल्ह्यातील २००७ मधील पुरग्रस्ताचे पुनर्वसनाकरिता रु.४० कोटी निधी मंजूर करुन त्वरीत पुनर्वसन करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २३ फेब्रुवारी,२०१६ रोजी मा. राज्यमंत्री, उद्योग व खनिकर्म, सार्वजनिक बांधकाम यांच्याकडे दिले असल्याचे त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेखावरुन दिसुन येत नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजूर (ता.भोकरदन, जि.जालना) परिसरातील शेतक-यांना पिक विम्याचे पैसे मिळण्याबाबत**

**(९) ७८६०४ (१४-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजूर (ता.भोकरदन, जि.जालना) परिसरातील २८० शेतक-यांनी दोन वर्षापूर्वी महाराष्ट्र ग्रामीण बँकेत पिक विमा भरला असून त्यांचे पैसे अद्यापही शेतक-यांना मिळाले नसल्याची माहिती माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर बँकांनी पीकविम्याचे पैसे दोन वर्षापूर्वीच शेतक-यांना वाटप केले असुन उक्त महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या दुर्लक्षामुळे शेतक-यांना पीक विम्याचे पैसे मिळण्याकरीता दोन वर्षे वाट पाहावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन सदर बँकेला आदेश देऊन शेतक-यांचे पीक विम्याचे पैसे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१०-२०१८) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा - राजूर (ता. भोकरदन जि. जालना) यांनी राष्ट्रीय कृषि विमा योजना खरीप २०१४ अंतर्गत विमा संरक्षण घेतलेल्या १०५५ शेतकऱ्यांचे विमा प्रस्ताव भारतीय कृषि विमा कंपनीस विहित कालावधी नंतर सादर केले. योजनेच्या तरतुदीनुसार उशिराने प्राप्त प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. या विषयी केंद्र शासनस्तरावर झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार बँकेने शेतकऱ्यांचे प्रस्ताव विहित मुदतीनंतर पाठविल्यामुळे सदर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची संपुर्ण जबाबदारी ही संबंधित बँकेची आहे. त्यामुळे भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत तसेच कृषि आयुक्तालयामार्फत दि.१०.१.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधित बँकांना पात्र शेतकऱ्यांची नुकसान भरपाई अदा करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अनुदान न पोचल्याने शेतक-यांच्या आत्महत्यामध्ये वाढ झाल्याबाबत**

**(१०) ८३६६१ (१५-०४-२०१७). श्री.मोहन फड (पाथरी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतक-याच्या आत्महत्या थांबविण्यासाठी राज्य शासनाने ५५० कोटींच्या अनुदानाची घोषणा केली, हे खरे आहे काय

(२) असल्यास, यापैकी १५ कोटी रुपये मागील तीन वर्षात आत्महत्याग्रस्त यवतमाळ, उस्मानाबाद या जिल्हयांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदान न पोचल्याने शेतक-यांच्या आत्महत्यामध्ये वाढ झाली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१८) :** (१) सन २०१४-१५ खरीप व रब्बी हंगामात ५० पैसे पेक्षा कमी पैसेवारी आलेल्या गावातील शेतकऱ्यांच्या पिक कर्जाचे व्याजासह रुपांतरण करुन अशा रुपांतरीत कर्जावरील १२ टक्के दराने होणाऱ्या व्याजापैकी ६ टक्के व्याज शासनामार्फत भरण्यासाठी अंदाजे रु.११०० कोटी पुढील ५ वर्षात शासनामार्फत अदा करण्याबाबत शासन निर्णय दिनांक २४ जुलै, २०१५ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. तसेच जलयुक्त शिवार योजनेंतर्गत सन २०१६-१७ या वर्षाकरीता निवड करावयाच्या ५०० गावांमध्ये यवतमाळ व उस्मानाबाद जिल्हयांना प्राधान्य देणे, कृषी समृध्दी प्रकल्प राबविणे, आत्महत्याग्रस्त जिल्हयातील विहीरी धडक सिंचन विहीर योजनेंतर्गत प्राधान्याने पूर्ण करणे यासारख्या विविध विभागामार्फत राबवावयाच्या योजनांची अंमलबजावणी तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(२), (३) व (४) मागील तीन वर्षात बळीराजा चेतना अभियानांतर्गत यवतमाळ जिल्हयासाठी रु.४३,६०,८०,०००/- व उस्मानाबाद जिल्हयासाठी रु.२८,०८,७०,०००/- ची आर्थिक तरतूद करण्यात आली. विविध उपक्रम राबविल्यामुळे या दोन जिल्हयांमध्ये सन २०१५ च्या तुलनेत सन २०१६ मध्ये शेतकरी आत्महत्यांच्या प्रकरणांमध्ये ११४ प्रकरणांची घट दिसून आली.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उस्मानाबाद व यवतमाळ या दोन जिल्ह्यांमध्ये पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत असून त्याअंतर्गत बळीराजा चेतना अभियान राबविण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी “छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७” राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

**नागरी सुविधांची पूर्तता करण्यासाठीचा निधी**
**उपलब्ध करून देण्याबाबत**

**(११) ९१६४६ (१५-०८-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००७ मधील पूरग्रस्त पुर्नवसित गावांना नागरी सुविधा उपलब्ध करण्यासंबंधीची विकास कामे पूर्ण होवूनही या कामांसाठीचा निधी अद्यापपर्यंत देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरी सुविधांची पूर्तता करण्यात आल्यामुळे तातडीने निधी उपलब्ध करून देण्याबाबतची अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास अपर मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-१०-२०१८) :** (१), (२) व (३) मा. लोकप्रतिनिंधी मौजे आखातवाडा, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती या पूरपुनर्वसित गावातील नागरी सुविधा कामांना रुपये २४,५४,३४०/- निधी वितरित करण्याची अपर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन) यांना दि. ५ जून,२०१७ रोजी विनंती केली होती. या अनुषंगाने मौजे आखातवाडा या गावातील नागरी सुविधा कामांना शासन निर्णय दि.२१.०८.२०१८ अन्वये रुपये २४,५४,३४०/- निधी मंजूर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाचे (ता.नेवासा, जि.अहमदनगर) गांवात वादळी वा-यामुळे वीज**
**कोसळून बालकांचा झालेला मृत्यू**

**(१२) ९२२३८ (१५-०८-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) (ता.नेवासा, जि.अहमदनगर) तालुक्यातील पाचेगांवात दिनांक ३ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास वादळी वा-यामुळे वीज कोसळून श्री.किरण गोरक्षनाथ भिसे (वय १२) या बालकाचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मृत्यूमुखी पडलेल्या बालकांच्या कुटुंबियाना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-१०-२०१८) :** (१) होय.
(२) शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदींनुसार सदर घटनेमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या बालकाच्या कुटुंबियांना रु. ४ लक्ष एवढी मदत देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मळवंडी (ता.मावळ, जि.पुणे) ठुले येथे नव्याने बांधण्यात आलेल्या धरणातील प्रकल्पग्रस्ताना जमिनी मिळण्याबाबत**

**(१३) ९४९८३ (२२-०९-२०१७). श्री.संजय कदम (दापोली), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मळवंडी (जि.पुणे, ता.मावळ) ठुले येथे नव्याने बांधण्यात आलेल्या धरणात श्रीमती सिंधुताई मारुती ठुलेंसह अन्य शेतकऱ्यांच्या सन १९९७ मध्ये सर्व जमिनी संपादित केल्यामुळे त्यांचे उदरनिर्वाहचे साधन नष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांनी पुनर्वसनासाठी ६५% रक्कम सन २००५ मध्ये शासनाकडे भरूनही मागील २० वर्षांपासून त्यांचे अद्यापही पुनर्वसन झालेले नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत सदर प्रकल्पग्रस्तांना उदरनिर्वाह भत्ता, भु-भाडे, खंडाच्या रकमा, प्रकल्पग्रस्त म्हणुन नोकरी मिळणेबाबत व संपादित जमिनीच्या मोबदल्यात मौ. डिंग्रजवाडी, (ता.शिरुर, जि.पुणे) येथील पर्यायी जमिनी मिळण्याबाबत मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा यांनी मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांना दिनांक १८ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे तसेच सदर प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन मिळण्याबाबत ॲड.जयदेव गायकवाड, वि.प.स. यांनी मा.मंत्री मदत व पुनर्वसन यांना दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने अ.मु.स. (म.व पु.) तपासावे असे निदेश देण्यात आले आहेत, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, दिनांक ३० ऑगस्ट, २००० रोजी वा त्यासुमारास मळवंडी ठुले प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा येथे झालेल्या बैठकीत मळवंडी ठुले प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन चास कमान लाभक्षेत्रात करण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास मा.उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), पुणे यांनी मा.उप सचिव, महसूल व वन विभाग (र-४) यांना दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पाठविलेल्या प्रस्तावात मळवंडी ठुले प्रकल्पग्रस्त यांनी मागणी केलेले चासकमान लाभक्षेत्रातील मौजे डिंग्रजवाडी येथील गट क्र.२३९ मधील क्षेत्र हे आराखड्याबाहेरील असल्याने मंजूरीसाठी पाठविण्यात आल्याचे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत दिनांक ३० ऑगस्ट, २००० रोजी वा त्यासुमारास प्रकल्पग्रस्तांच्या चासकमान लाभक्षेत्रात जमीन मिळण्याच्या मागणीला शासनाने यापूर्वी मान्यता दिली असतानाही सदर जागा नियोजित आराखड्याबाहेरील असल्याचे सांगून पुन्हा शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्याची कारणे काय आहेत,

(७) असल्यास, शासनाची फेरमंजूरीची आवश्यकता नसतानाही उपजिल्हाधिकारी(पुनर्वसन), पुणे यांनी मा.उप सचिव, महसूल व वन विभाग यांना दिनांक ५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने वि.प.स. ॲड. जयदेव गायकवाड यांनी पुन्हा अपर सचिव व उप सचिव (र-४) यांना पुन्हा दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(८) उक्त पत्राच्या अनुषंगाने सदर प्रकल्पग्रस्तांना मौ.डिंग्रजवाडी (ता.शिरुर, जि.पुणे) येथे गट क्र.२३९ मधील जमिन त्वरित देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-१०-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) होय हे खरे आहे.

(४) होय हे खरे आहे.

(५) होय हे खरे आहे.

(६) प्रकल्पग्रस्तांची आराखडयाबाहेरील पर्यायी जमिन मिळण्याबाबतची मागणी असल्याने दि.०३.०३.२०१६ रोजीच्या पत्रानुसार शासन मान्यतेची आवश्यकता आहे.

(७) होय हे खरे आहे.

(८) मौजे डिंग्रजवाडी ता.शिरुर जि.पुणे येथील गट क्र. २३९ येथील क्षेत्र वाटप करण्यास दि.५.१२.२०१७ च्या पत्राद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

---

### मच्छिमारांच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घेणेबाबत

**(१४) ९५४२२ (२९-१२-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सागरी किनारपट्टीवर मासेमारी व्यवसायावर अवलंबून असलेला आणि या व्यवसायाच्या माध्यमातून राज्याला व देशाला परकीय चलन मिळवून देणारा मच्छिमार समाज सदयस्थितीत अनेक समस्यांमध्ये सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मच्छिमारांच्या समस्यांवर मार्ग काढण्यासाठी तातडीने निर्णय घ्यावा, अशा आशयाचे सविस्तर निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा. मंत्री, मत्स्यविकास यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर निवेदनास अनुसरून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) निवेदनांतील मुद्यांना अनुसरुन खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे:-

मच्छिमारांच्या घरांखालील जमिनी त्यांच्या नावावर करणे ही बाब महसूल विभाग़ाशी संबंधित आहे. माथाडी कामागारांच्या धर्तीवर निवासस्थान बांधून देण्याची बाब गृहनिर्माण विभागाशी संबंधित असून मच्छिमारांसाठी कामगार कल्याण बोर्डाची स्थापना करण्याची बाब ही कामगार विभागाशी संबंधित असल्यामुळे संबंधित विभाग़ाकडुन कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

मत्स्यव्यवसाय हा कृषि क्षेत्रांतर्गत येत नसल्यामुळे मच्छिमारांना कर्जमाफी देता येत नाही. त्यामुळे मत्स्यव्यवसायाचा कृषि क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्री यांना मत्स्यव्यवसायाचा कृषी क्षेत्रामध्ये समावेश करणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

मासेमारी बंदी काळात मच्छिमारांना अनुदान मिळण्यासाठी राष्ट्रीय कल्याणकारी बचतीसह मदतीची योजना राबविण्यात येत आहे.

मच्छिमार वस्तींच्या गावांमध्ये धूपप्रतिबंधक बंधारे बांधण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे करण्यात येते.

दि. २७.४.२०१८ च्या अधिसूचनेन्वये राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात ट्रॉलिंग किंवा पर्ससीन किंवा गिलनेट किंवा डोलनेट यांचा वापर करुन यांत्रिक तसेच यंत्रचलित (बोटी) मासेमारी नौकांना जनरेटर अथवा जनरेटर शिवाय चालणारे कृत्रिम एलईडी दिवे लाईट, माश्यांना आकर्षित करणारे दिवे किंवा कोणतेही अशा प्रकारची इतर सामुग्री यांच्या मासेमारीस वापर करण्यास तसेच बुल आणि पेअर ट्रॉलिंगद्वारे मासेमारी करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची नुकसानीची NDRF/SDRF अंतर्गत घोषित केलेली मदत प्रलंबित असल्याबाबत

**(१५) ९६७९५ (२९-१२-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात ऑगस्ट - सप्टेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान प्रचंड अतिवृष्टी, पुरामुळे शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे प्रचंड नुकसान झाले.सदरचे शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे नुकसानीचे पंचनामे करून जिल्हाधिकारी लातूर यांनी राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी / राज्य आपत्ती निवारण निधी अंतर्गत ३४४ कोटी १७ लक्ष रुपयांचा मदतीचा प्रस्ताव शासनास सादर केला त्यानुषंगाने सदरची मदत एक महिन्यात देण्याची घोषणा मा.मदत पुनर्वसन राज्य मंत्री महोदयांनी दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, NDRF च्या निकषानुसार ३३ टक्केपेक्षा जास्त नुकसान असताना देखील उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांस नुकसान भरपाई न देण्याचे कारण काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास,चौकशीअंती सदर राष्ट्रीय आपत्त्ती निवारण निधी/ राज्य आपत्ती निवारण निधी अंतर्गत महसूल व वन विभागाच्या शासन आदेशानुसार शेतीपिकाच्या नुकसानीची मदत शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-१०-२०१८) :** (१) लवकरात लवकर नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याची कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते.
(२) शासन निर्णय दिनांक २०.०७.२०१८ अन्वये माहे एप्रिल ते नोव्हेंबर २०१६ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व अवेळी पावसामुळे उस्मानाबाद जिल्ह्यात झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी रु. ११२०६.९३ लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर निधी बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वितरित करण्याची कार्यवाही तहसीलदारांच्या स्तरावर सुरु आहे.
(३) व (४) माहे एप्रिल ते नोव्हेंबर २०१६ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व अवेळी पावसामुळे लातूर जिल्ह्यात झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी दि. ९.१.२०१७ च्या शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडून रु. ५५२१.७२ लक्ष रुपयांचा मदतीचा सुधारीत प्रस्ताव शासनास प्राप्त झाला.

त्यानुसार शासन निर्णय दिनांक २०.०७.२०१८ अन्वये माहे एप्रिल ते नोव्हेंबर २०१६ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व अवेळी पावसामुळे लातूर जिल्ह्यात झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी रु. ५५२१.७२ लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर निधी बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वितरित करण्याची कार्यवाही संबंधित तहसीलदारांच्या स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कारला (ता.अंजनगाव सुर्जी) येथील केळीच्या पीकविम्याची नुकसानभरपाई देण्याबाबत**

**(१६) १००४७९ (२७-१२-२०१७). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कारला (ता.अंजनगाव सुर्जी) येथील शेतकरी श्री.चंदसेन वानखडे यांनी सन.२०१२-१३ या कालावधी मध्ये त्याच्या शेतामध्ये एकरावर केळी फळ पिकाची लागवड केली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुका कृषी अधिकारी कार्यालय अंजनगाव सुर्जी यांनी मंडळाची चुकीची माहिती दिल्याने श्री.चंदसेन वानखडे व त्यांच्या कुटुंबातील शेतकऱ्यांची पीकविमा न मिळाल्याने ५,००,००० लक्ष रुपयांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास,चौकशीअंती तालुका कृषी अधिकारी कार्यालय अंजनगाव सुर्जी यांनी केळी पिकाच्या मंडळाची चुकीची माहिती दिल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई तसेच श्री.चंदसेन वानखडे व त्यांच्या कुटुबातील शेतकऱ्यांची पीकविमा न मिळाल्याने ५,००,००० लक्ष रुपयांचे नुकसान झाले याची नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१०-२०१८) :** (१) नाही (त्यांचे कुटुंबियाचे नावे लागवड आहे.)
(२) नाही.
(३) होय.
(४) प्रश्न उद्भवत नाही. संबंधित गांव महसूल मंडळ सन २०१२-१३ मध्ये केळी या फळपिकासाठी अधिसुचित नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### विदर्भातील ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या पीकांचे झालेले नुकसान

**(१७) १०५५८२ (०१-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्याच्या विदर्भाच्या बहुतांश जिल्हयातील ग्रामीण भागात ५० टक्के पेक्षा कमी आणेवारी आल्याचा अहवाल शासनास सादर होत असल्याचे वृत्त माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विदर्भाच्या बहुतांश जिल्हयातील ग्रामीण भागात पावसाचे प्रमाण कमी अधिक झाल्याने पिके नष्ट झाली असल्याचे निदर्शनास येते, हे हि खरे आहे काय ,
(३) असल्यास, सदर विदर्भाच्या बहुतांश जिल्हयातील ग्रामीण कापूस उत्पादक भागात कीड लागून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असल्याचे सुद्धा निदर्शनास येते, हे हि खरे आहे काय ,
(४) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१८) :** (१) सन २०१७-१८ च्या खरीप हंगामात विदर्भातील ९७९९ गावांची अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी घोषित करण्यात आली होती. सदर गावांमध्ये महसुल व वन विभाग, दि.२८ फेब्रुवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये खालील उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

१) जमीन महसूलात सूट
२) सहकारी कर्जाचे पुनर्गठन
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती
४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात ३३.५% सूट
५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी.
६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता
७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर
८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

(२) व (३) अंशतः खरे आहे.
(४) व (५) खरीप २०१७ मध्ये बोंडअळीच्या प्रादुर्भावामुळे कापूस पिक व तुडतुडे रोगाच्या प्रादुर्भावामुळे धानपिकांच्या झालेल्या नुकसानीपोटी बाधित शेतकऱ्यांच्या मदतीसाठी महसुल व वन विभाग, शासन निर्णय, दि.८ मे, २०१८ अन्वये एकूण रू.३४८४६१.२५ लक्ष इतकी रक्कम तीन समान हप्त्यामध्ये वितरीत करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यापैकी अद्यापपर्यंत रू.२३५९.५४ इतका निधी बाधित शेतकऱ्यांना वाटप करण्यासाठी वितरीत करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर, सोलापूर, सांगली, सातारा, बीड या जिल्हयामध्ये चारा छावण्यामध्ये झालेली अनियमितता

**(१८) १०६६६७ (०१-०४-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अहमदनगर, सोलापूर, सांगली, सातारा, बीड या जिल्हयातील १२७३ चारा छावण्यामध्ये अनियमितता झाल्याने सोलापूरचे नागरिक श्री गोरख आनंद घाडगे यांनी सन २०१३ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक १६४/१३

या याचिकेस अनुसरून मा. न्यायाल्याने दिनांक ८/१/२०१५ रोजी दिलेल्या आदेशात बनावट आणि अनियमितता असलेल्या चारा छावण्या आणि त्या चालविणारे व्यक्ती /संस्था यांचेवर त्वरित कठोर कारवाई आणि सक्त वसुलीचे आदेश दिल्यामुळे राज्याच्या उपसचिव महसूल आणि वन विभाग यांनी दिनांक ६/९/२०१७ रोजी कारवाई करण्याबाबत आदेश निर्गमित करूनही अद्यापि दोषींविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,.

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती या सर्व दोषींवर कारवाई किती कालावधीत करणार असून सन २०१५ मध्ये न्यायालयाने दिलेल्या आदेशांवर अंमलबजावणी करण्यास शासनाने तब्बल २ वर्षे विलंब केला याबद्दल दोषी अधिकारी वर्गावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१८) :** (१) शासनाच्या दिनांक ६/९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक २३/०२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये सन २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षात अनियमितता आढळून आलेल्या चारा छावण्यांविरूध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार राज्यात चारा छावणी संस्थाचालकांवर एकुण ९३५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच ज्या चारा छावणीमध्ये अनियमितता झाली आहे त्या चारा छावणीच्या देयकातून दंडणीय रक्कम कपात केली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्हयात प्रकल्पग्रस्तांनी येथील प्रकल्पग्रस्तांनी बनावट दाखला देऊन नोकरीचा लाभ मिळविल्याबाबत

**(१९) १०८४२१ (०७-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील मुळचे रहिवाशी असलेले परंतु बीड येथील प्रकल्पग्रस्त असल्याचे दाखले सादर करुन नाशिक शहरातील एका हॉस्पिटलमध्ये १० ते १२ व्यक्तींनी प्रकल्पग्रस्ताच्या आरक्षणामध्ये आरोग्य विभागात नोकरी मिळविल्याची माहे डिसेंबर २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारचे दाखले एकुण १० ते १२ व्यक्तींनी एकाच वेळी प्राप्त करुन घेतलेले आहेत सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

माहे डिसेंबर २०१७ मध्ये व त्या दरम्यानत नाशिक शहरातील आरोग्य विभागात प्रकल्पग्रस्त उमेदवारास नियुक्ती देण्यात आलेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरुड, मोर्शी व चांदुर बाजार (जि.अमरावती) तालुक्यात संत्रा बागांचे झालेले नुकसान**

**(२०) १०९०५५ (०१-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरुड, मोर्शी व चांदुर बाजार (जि.अमरावती) तालुक्यातील संत्रा तोडणीच्या हंगाम सुरु होण्याच्या ऑक्टोंबर महिन्यापर्यंत बुरशीजन्य रोगामुळे ८० टक्के बागांमध्ये फळाची गळती झाल्याचे माहे डिसेंबर २०17 मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१०-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) अमरावती जिल्हयातील बाधित क्षेत्राचे कृषि विभाग, महसूल व जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत संयुक्त पंचनामे करण्यात आले असता, ३८१४१.७७ हे. क्षेत्रावरील संत्रा पिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचे दिसून आले. सदर आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत प्रदूषण रोखण्यासाठी ई-रिक्षा सेवा सुरु करण्याबाबत.**

**(२१) १०९२५१ (०१-०४-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) येथे वाढणारे प्रदूषण रोखण्यासाठी दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनातर्फे ई-रिक्षा सेवा सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालेगावसह नाशिक जिल्हयातील कोणकोणत्या भागात ई-रिक्षा सेवा-सुविधा सुरु करण्यात आली आहे व त्यापासून नागरीकांना कोणते लाभ झाले आहे,
(३) असल्यास, मागील वर्षात मुंबई शहराचे सातत्याने वाढणारे व यामुळे नागरीकांचे जीवन धोक्यात आणणारे प्रदूषण रोखण्यासाठी, मुंबईत देखील ई-रिक्षा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-१०-२०१८) :** (१) ते (३) केंद्र शासनाच्या दि.०८.१०.२०१४ च्या अधिसूचनेव्दारे ई-रिक्षा व ई-कार्ट संदर्भात धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. सदर अधिसूचनेतील तरतूदी लक्षात घेवून दि.०३.०८.२०१६ व दि.०२.०९.२०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील मुंबई महानगर प्रदेश परिवहन प्राधिकरण क्षेत्राव्यतिरिक्त उर्वरित क्षेत्रासाठी लागू करण्यात आलेले आहे. वरील धोरणानुसार मालेगावसह प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, नाशिकमधील संपूर्ण कार्यक्षेत्रासाठी ई-रिक्षा नोंदणी सुरू करण्यात आली असून ४ वितरकांना ई-रिक्षा विक्रेते म्हणून व्यवसाय प्रमाणपत्र देण्यात आले आहे. तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, मालेगांव कार्यालयात माहे मे, २०१८ अखेर १ ई-कार्ट व १ ई-रिक्षा नोंदणी करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर, ठाणे, मुंबई येथील परिवहन विभागाचे अधिकारी लाखोची हफ्ता वसुली करीत असलेबाबत

**(२२) ११०१११ (०१-०४-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर, ठाणे, मुंबई येथील परिवहन विभागाचे अधिकारी दलालांच्या माध्यमातून अवजड वाहतुकीची वसुली करून शासनाच्या तिजोरीत जाणारा पैसा दलालांच्या माध्यमातून अधिका-यांकडे जात असून अधिकारी पदाचा गैरवापर करीत असल्याचे दिनांक ०८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर प्रकरणी अधिकारी व दलाल यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-१०-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

माहे एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीत प्रादेशिक परिवहन कार्यालय,मुंबई (मध्य/पूर्व/पश्चिम), ठाणे तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, नवी मुंबई, बोरिवली व वसई यांच्या अधिनस्त वायुवेग पथकामार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रात भारक्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक करणा-या एकुण ४५३१९ वाहनांची तपासणी करण्यात आली असूनदोषी ठरलेल्या ५९८० वाहनांकडून तडजोड शुल्क/ विभागीय दंडापोटी रु. ११५२.८५ लक्ष वसूल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबावर होत असलेल्या अन्यायाबाबत

**(२३) ११०४१५ (०४-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांच्या आत्महत्येनंतर त्यांच्या विधवा पत्नींला घर, समाज, सरकारी प्रक्रिया, शेती इत्यादी संघर्ष करावा लागत असल्याचे प्रकृती संस्थान हाऊसिंग ॲण्ड लॅण्ड राईट्स नेटवर्क या संस्थांनी संयुक्तपणे केलेल्या पाहणीत माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घर अथवा जमिनींवरील हक्काची मागणी केली की, कुटूंबातील जेष्ठ मंडळीकडून त्यांचा आवाज दाबला जातो तर अधिकार मागितले की, कुटूंबात बहिष्कृतासारखी वागणूक मिळते, स्त्रियांना अधिकार देण्यास स्पष्ट नकार दिला जातो, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नी व त्यांची मुले यांच्यावर कुटूंबातील व्यक्तींकडून होणाऱ्या अन्यायापासून संरक्षण तसेच त्यांचे हक्क त्यांना मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१८) :** (१) व (२) असा अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही.

(३), (४) व (५) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या घरी जावून सखोल माहिती प्राप्त करुन त्यानुसार त्यांच्या कुटुंबियांस नियमानुसार काय मदत करता येईल याचा कार्यक्रम तयार करुन त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना शासन निर्णय दि. २८/०४/२०१४ अन्वये देण्यात आल्या आहेत.

त्याचप्रमाणे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ नुसार कुटुंबामध्ये विवाहित महिलेचा छळ होत असल्यास अशा पिडीत महिलांना संरक्षण देण्याची तरतूद आहे.

---

## पंढरपूर, मंगळवेढा, (जि.सोलापूर) तालुक्यात शेती अवजारास निधी देण्याबाबत

**(२४) ११०८८८ (०१-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर, मंगळवेढा, (जि.सोलापूर) तालुक्यात राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून शेतकऱ्यांना ट्रॅक्टर पॉवर लिटर व ट्रॅक्टरवर चालणारे अवजार अनुदानासाठी मागणीच्या प्रमाणात निधीची तरतुद करण्यात आली नसल्यामुळे शेतकऱ्यांची निराशा झाल्याची घटना माहे जानेवारीच्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून सन २०१७-२०१८ यावर्षासाठी शासनाने ७ कोटी ८९ लक्ष ९० हजाराचे उद्दीष्ट दिले आहे यामधून

शेतीतील विविध अवजारे घेण्याचे प्रावधान आहे परंतु ही रक्कम अतिशय तुटपुंजी असल्यामुळे शेतकऱ्यांना सदर योजनेपासून वंचित रहावे लागत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेती अवजारे घेण्याच्या प्रस्तावावर संबंधित प्रशासनाने शासनाला सुधारित जादा अनुदान मागणी प्रस्ताव सादर केला नसल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने शेतकऱ्यांचे शेती अवजारे घेण्याच्या मागणी प्रस्तावाला जादा निधी तातडीने देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१८) :** (१) योजनेंतर्गत राज्यस्तरावर उपलब्ध एकूण अनुदानापैकी जिल्हयांतील खातेदारांच्या संख्येच्या प्रमाणात जिल्हा तालुकानिहाय निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

(२) राज्य स्तरावर उपलब्ध झालेल्या निधीपैकी सोलापूर जिल्हयासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनां, कृषि यांत्रिकीकरण उप-अभियान व अन्न सुरक्षा अभियानांतर्गत एकूण रु.१४.२१ कोटी निधी सन २०१७-१८ या वर्षात उपलब्ध करुन देण्यात आला होता.

(३) व (४) योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हयांच्या खातेदार संख्येच्या प्रमाणात उपलब्ध निधीतून सोलापूर जिल्हयास, प्रवर्गनिहाय लक्षांक वाटप व निधी वितरित करण्यात आला असल्याने व राज्य स्तरावर उपलब्ध निधीचे सर्व जिल्ह्यांना वाटप करण्यात आल्याने सोलापूर जिल्ह्यास वाढीव लक्षांक देता येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगाव, नांदगाव व येवला (जि.नाशिक) या तालुक्यात ओखी व बोंड अळीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन त्यांना नुकसान भरपाई त्वरित देण्याबाबत

**(२५) १११६५० (०१-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव, नांदगाव व येवला (जि.नाशिक) या तालुक्यात ओखी व बोंड अळीमुळे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा दरम्यान झालेल्या नुकसानीचे पंचनामे अदयाप करण्यात आले नसल्यामुळे शेतक-यांना नुकसान भरपाई अदयापी मिळाली नसल्यामुळे शेतकरी वर्गात तीव्र असंतोष व संतापाची भावना पसरली असल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती नुकसानीचे पंचनामे लवकारात लवकर पूर्ण करणेबाबत तसेच शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१८) :** (१) सदर बाब निदर्शनास आली नाही.
(२) व (३) नाशिक जिल्ह्यात दिनांक ४ ते ६ डिसेंबर २०१७ दरम्यान आलेल्या ओखी वादळामुळे बाधित झालेल्या व्यक्तींना रु. २,३३,०८,२९०/- एवढे अनुदान मंजूर करण्यात आले असून, मदत वाटपाची कार्यवाही संबंधित तहसीलदारांच्या स्तरावर सुरु आहे.

नाशिक जिल्ह्यात बोंडअळीच्या प्रादुर्भावामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी पहिल्या टप्प्यात रु. ७,०२,००,०००/- व दुसऱ्या टप्प्यात रु. १०,५४,००,०००/- एवढे अनुदान मंजूर करण्यात आले असून, मदत वाटपाची कार्यवाही संबंधित तहसीलदारांच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयात शेतक-यांनी केलेली आत्महत्या**

**(२६) ११४१७८ (०१-०४-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयात तीन वर्षे कोरडा तर एक वर्ष ओला दुष्काळ पडल्यामुळे मागील चार वर्षात ६४१ शेतक-यांना आत्महत्या केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे ,
(३) असल्यास, चौकशीअंती नांदेड जिल्हयात सन २०१४ मध्ये ११८, २०१५ मध्ये १९० तर २०१६ मध्ये १८०, सन २०१७ मध्ये १५३ शेतक-यांनी आत्मनोंद जिल्हाप्रशासनाकडे आहे संबंधितांना आर्थिक मदत मिळाली असली तरी ती तुटपुंजी आहे, नांदेड येथील शेतक-यांकडे पुरक व्यवसाय किंवा उदयोग नसल्याने दुस-यासमोर पैशासाठी हात पसरावे लागत असुन त्यांच्यापुढे कर्जाचा डोंगर वाढत आहे हे लक्षात घेता शेतक-यांच्या शेतीमालाला किमान आधाराभूत किंमत मिळावी याकरिता तसेच इतरही आवश्यक सहाय्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) शेतकरी आत्महत्या पात्र प्रकरणी शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना रू.१.०० लाख इतके सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

शेतमालाला किमान आधारभूत किंमती जाहीर करणे ही बाब पूर्णपणे केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. केंद्र शासनाने खरीप २०१८-१९ साठी पीक उत्पादन खर्चावर ५० टक्के नफा धरून किमान आधारभूत किंमती जाहीर केल्या आहेत.

शेतकऱ्यांच्या मालाला वाजवी भाव मिळावेत म्हणून त्याचा उत्पादन खर्च कमी व्हावा, उत्पन्न वाढावे, नफ्याचे प्रमाण वाढावे याकरीता शासन अनेक योजना राबविते. यामध्ये विविध योजनांतर्गत अनुदानावर निविष्ठा पुरविणे, गोडावून बांधणीचे प्रकल्प हाती घेणे, गोडावून पावतीवर शेतकऱ्याला अल्पदराने कर्ज मिळवून देणे, अल्प दराने पीक कर्ज उपलब्ध करून देणे, निर्यातीसाठी सुविधा उपलब्ध करून देणे, बाजारभाव कोसळल्यानंतर हमीभावाने शेतमालाची खरेदी करणे, नैसर्गिक आपत्ती ओढवल्यास NDRF व SDRF अंतर्गत आर्थिक मदत करणे, कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना देणे, अनुदान देणे इत्यादी बाबींचा समावेश करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे बोर्डा, भारसवाडी, निंभोरा (ता.तिवसा, जि.अमरावती) येथे पिक विमा न काढलेल्या शेतकऱ्यांना अनुदानीत रक्कम न मिळाल्याबाबत**

**(२७) ११५७३६ (०१-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बोर्डा, भारसवाडी, निंभोरा (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील ब-याच गावात खरीप हंगाम २०१५-१६ मध्ये पिक विमा न काढल्यामुळे शेतकऱ्यांना अजुनही अनुदानीत रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेली नसल्याने अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांना मिळावी म्हणून स्थानिक लोकप्रतिनीधींनी दिनांक २२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन दिले, हे खरे आहे,
(२) असल्यास, सदर अनुदानीत रक्कम शासनाने ॲक्सीस बँक अमरावतीला मागील मार्च २०१७ ला वर्ग केली असता स्थानिक तलाठी यांना वारंवार मागणी करुन अनुदानाची रक्कम मिळली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती शेतकऱ्यांना पिक विम्याची अनुदानीत रक्कम देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१८) :** (१) होय.
निवेदनाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याकरीता निवेदन दिनांक ०७/०२/२०१८ रोजी तहसिलदार, तिवसा यांचेकडे पाठविण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
तहसिलदार, तिवसा यांचेकडून प्राप्त पत्रानुसार खरीप-२०१५ मधील सोयाबिन पिक विमा न काढलेल्या बोर्डा येथील ३३७, भारसवाडी येथील १४५ व निंभोरा येथील ४०३ पात्र खातेदारांचे खात्यावर अनुक्रमे रु.१३४८०३८/-, रु.७२३५१०/- व रु.२१२०४०७ एवढी रक्कम RTGS प्रणालीद्वारे थेट खातेदारांच्या बँक खात्यात जमा करण्याकरीता अक्सीस बँक अमरावतीकडे पाठविण्यात आली आहे.

(३) तहसिलदार, तिवसा यांचे पत्रानुसार बोर्डा येथील ३२६, भारसवाडी येथील १४३ व निंभोरा येथील ३८४ खातेदारांच्या बँक खात्यात अनुदान रक्कम अनुक्रमे रु.१२९८१३१/-, रु.७०९७५५/- व रु.२०१२३१४/- जमा झाली असून उर्वरित बोर्डा येथील ११, भारसवाडी येथील २ व निंभोरा येथील १९ खातेदारांच्या बँक खात्यामध्ये वा नावामध्ये अडचण आहे. त्यांची दुरुस्ती करुन परत आलेले अनुदान पुन:श्च त्यांचेच बँक खात्यात पाठविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आकनूर, (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) येथील श्री.राजेंद्र दादू पाटील यांना प्रकल्पग्रस्त प्रवर्गात नेमणूकीबाबत**

**(२८) ११६५७७ (०८-०६-२०१८). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आकनूर, (ता.राधानगरी, जि.कोल्हापूर) श्री.राजेंद्र दादू पाटील यांनी सन १९९६ ते २०१३ अखेर प्रकल्पग्रस्त प्रवर्गातून थेट नेमणूकीकरीता २९३८ प्रकल्पग्रस्तांना सामावून घेवून अन्याय झाला असल्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या आपले सरकार पोर्टलवर टोकन आयडी क्रमांक Dept/REVD/२०१७/३९०१ नुसार तक्रार देवूनही विभागीय आयुक्त तथा मुख्य नियंत्रक अधिकारी (पुनर्वसन), पुणे विभाग, पुणे यांचेकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.राजेंद्र दादू पाटील, यांनी जिल्हाधिकारी कोल्हापूर व जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेकडे अर्ज करुन अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री पाटील यांचा प्रकल्पग्रस्त यादीतील सेवाजेष्ठता क्रमांक १९३ असून त्यांची प्रकल्पग्रस्त प्रवर्गातून थेट नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपिठ, औरंगाबाद यांनी दि. ०९.०७.२००९ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन सामान्य प्रशासन विभागाच्या, दि.२७.१०.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रकल्पग्रस्तांना शासकिय सेवेत गट - क व गट - ड पदांवरील नियुक्त्या संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार, उमेदवारांची पात्रता तपासून जाहिरात देवून स्पर्धा परीक्षेमध्ये त्यांची नियुक्ती गुणवत्तेनुसार केली जावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे सन २००९ पासून प्रकल्पग्रस्त प्रवर्गातून जेष्ठतेनुसार थेट नेमणूक करण्याबाबतची कार्यवाही केली जात नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळामार्फत प्रत्येक एसटी बसमध्ये बसविलेल्या मोफत वायफाय योजनेबाबत**

**(२९) ११६८९४ (२३-०७-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळामार्फत प्रत्येक एसटी बसमध्ये बसविलेल्या मोफत वायफाय योजना अयशस्वी झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कमी अंतरासाठी प्रवास करणाऱ्या एसटी बसमध्ये वायफायसाठी बसवलेली यंत्रणा गायब झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन एसटी बसमध्ये मोफत वायफाय योजना योग्य पद्धतीने चालावी व त्याचा सर्वसामान्य प्रवाशांना फायदा होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-१०-२०१८) :** (१) व (२) नाही.

(३) राज्य परिवहन महामंडळाच्या प्रवाशांना त्यांच्या वायफाय युक्त स्मार्टफोन मधून हॉटस्पॉटच्या माध्यमातून मोफत मनोरंजनात्मक सुविधा प्राप्त करुन घेण्यासाठी अंदाजे १३००० बसेसमध्ये वायफाय उपकरणे बसविलेली आहेत. राज्य परिवहन महामंडळ बसस्थानकावर प्रवासी प्रबोधन कार्यक्रमांतर्गत प्रवाशांना बसमध्ये उपलब्ध असलेल्या वायफाय सुविधेची माहिती देण्यात येते.

बस दुरुस्तीसाठी विभागीय कार्यशाळेत पाठविताना सुरक्षेच्या कारणास्तव सेवा पुरवठादार यांचेकडून वायफाय उपकरणं काढून घेण्यात येते व बस दुरुस्ती झाल्यानंतर सदर उपकरणं पुन:श्च बसविण्यात येते. काही तांत्रिक कारणास्तव वायफाय उपकरण बंद पडल्यास अथवा काही तांत्रिक अडचण उदभवल्यास सेवा पुरवठादार यांचेकडून तात्काळ दूर करुन सेवा पुर्ववत केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मीठ - मुंबरी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील खार बंधाऱ्यांच्या दुरुस्तीबाबत**

**(३०) ११७३३६ (३१-०७-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीठ - मुंबरी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील खार बंधाऱ्यावरील उघाड्याची नादुरुस्ती होऊन बंधारा तुटून २ वर्ष झाली तरी दुरुस्ती करण्याचे काम हाती घेण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खार बंधाऱ्याच्या नादुरुस्तीमुळे भात शेतीच्या क्षेत्रात खारे पाणी शिरून भात शेतीचे नुकसान होत असल्याने फुटलेला बंधारा तात्काळ बांधाण्याची मागणी मिठ-मुंबरी ग्रामस्थ व सरपंचानी खारभूमी विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मीठ-मुंबरी येथील खार बंधारा दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर योजनेस सा. क्र. १०५ मी. व सा.क्र.२७० मी. अशा दोन उघाडया आहेत. त्यापैकी सा.क्र.२७० मी. वरील उघाडी सुस्थितीत आहे.

सा.क्र.१०५ मी. वरील उघाडी नादुरुस्त असून निधीच्या उपलब्धतेनूसार तातडीची उपायायोजना म्हणून उघाडीचा दरवाजा नव्याने बसवून पुन:प्रापित क्षेत्राचे अधिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात आली आहे.
(२) ग्रामपंचायत, मिठ - मुंबरी यांनी फेब्रुवारी, २०१५ मध्ये सदर बांधाच्या दुरुस्तीचे काम करणेबाबत कार्यकारी अभियंता, सिंधुदूर्ग खारभूमी विकास विभाग, सिंधुदूर्गनगरी यांना निवेदन सादर केले होते.
(३) सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात विस्तार व सुधारणाकरिता निधी उपलब्ध असून प्रापणसूचीत या कामाचा समावेश केला आहे.

सा. क्र. १०५ मी वरील उघाडीच्या व बांधाच्या दुरुस्तीचे कामाचे अंदाजे रु. १३.०० लक्ष इतक्या किंमतीचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असून पावसाळी हंगामानंतर सदर काम अग्रक्रमाने हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे येथे नविन कृषी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(३१) ११७९८६ (२४-०७-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी व पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचे विभाजन करुन दोन नवीन कृषी विद्यापीठाची स्थापन करण्याबाबत डॉ.वेंकटेश्वरलु समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यानुसार तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी या विद्यापीठाचे विभाजन करुन धुळे येथे नविन कृषी विद्यापीठ निर्माण व्हावे अशी मागणी करुनही शासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृषी विद्यापीठ स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही हे खरे नाही.
(३)महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला या दोन विद्यापीठांचे विभाजन करुन दोन नवीन कृषि विद्यापीठे स्थापन करणे आवश्यक आहे का याची तपासणी करण्यासाठी दि. १९/८/२०१३ च्या शासन निर्णयान्वये डॉ. वाय.एस.पी. थोरात, माजी अध्यक्ष नाबार्ड यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने दि.६/१/२०१५ च्या पत्रान्वये सदर कृषि विद्यापीठांचे विभाजन करुन पूर्व विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्राकरीता स्वतंत्र कृषि विद्यापीठ स्थापन करण्यासारखी परिस्थिती असल्याचा अहवाल शासनास सादर केला.

सदर अहवालानुसार कार्यवाही करण्याकरीता काही आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय बाबींच माहिती विचारात घेणे आवश्यक ठरत होते. सदर विभाजनास अनुलक्षून आवश्यक तपशील संकलित करुन शासनास सादर करण्यासाठी शासन निर्णय दि. १४/५/२०१५ अन्वये डॉ. वेंकटेश्वरलु, कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. डॉ. वेंकटेश्वरलु यांच्या अध्यक्षतेखाली समितीने दि. २९/१२/२०१५ च्या पत्रान्वये आपला अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने नवीन कृषि विद्यापीठाचे कार्यक्षेत्र, त्याअंतर्गत येणारी सध्याची महाविद्यालये, संशोधन केंद्राची पिकांचा विचार करुन विभागणी व आवश्यक निधी इ. अशा बाबीवर राज्य कृषि परिषदेच्या स्तरावर हा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर प्रादेशिक परिवहन विभागात युनिक आयडेंटी क्रमांक दोन वाहनांना अधिकृतरित्या दिल्याबाबत

**(३२) ११८३२८ (२३-०७-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर प्रादेशिक परिवहन विभागात युनिक आयडेंटी असणारा एकच वाहन क्रमांक दोन वाहनांना अधिकृतरित्या दिल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या क्रमांकाच्या दोन्ही वाहनमालकांना ओरिजनल आर.सी बुक दिले असुन एक वाहन महापालिका आयुक्तांच्या नावावर तर दुसरे वाहन महावितरणाच्या उपअभियंत्याच्या नावावर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रादेशिक परिवहन विभागाच्या भोंगळ कारभाराची कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे. सदर प्रकरण ३ ऑगस्ट, २०१७ रोजी वर्तमानपत्रामध्ये बातमी प्रसिद्ध झाल्याने निदर्शनास आले आहे.
(२) दोन्ही वाहनांना नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले होते. एक वाहन आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांचे नावे आहे व दुसरे वाहन महावितरणाच्या उप अभियंत्याच्या नावे नसून श्रीमती. गीता लक्ष्मण काळे यांच्या नावे आहे.
(३) प्रादेशिक परिवहन कार्यालय,कोल्हापूर कार्यालयाने दि.२८.०३.२०१२ रोजी आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांना एमएच-०९ एजी ६००० हा वाहन नोंदणी क्रमांक दिला याबाबतची नोंदणी हस्तलिखीत नोंदणी पुस्तकात घेण्यात आली परंतू संगणकीय टुल्स प्रणालीत घेण्यात आली नाही. सप्टेंबर २०१५ मध्ये संगणक टुल्स व वाहन१.० प्रणाली मध्ये एमएच-०९ एजी ६००० हा वाहन नोंदणी क्रमांक रिक्त असल्याचे आढळल्याने आकर्षक नोंदणी क्रमांकाकरिता चे विहित शुल्क आकारुन सदर क्रमांक श्रीमती गीता लक्ष्मण काळे यांना देण्यात आला.

उपरोक्त बाब माहे ऑगस्ट २०१७ मध्ये निदर्शनास आल्यानंतर आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांच्या वाहनाला देण्यात आलेला एमएच-०९ एजी ६००० हा नोंदणी क्रमांक व वाहन नोंदणी प्रमाणपत्र रद्द करुन त्यांना एमएच-०९ एजी ०६६३ हा नोंदणी क्रमांक देण्यात आला असून वाहन नोंदणी प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे.

माहे मार्च २०१२ मध्ये वाहनाची नोंदणी झाल्यानंतर हस्तलिखीत अभिलेख्याची नोंद संगणकावर न घेतल्याबाबत तत्कालीन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी तथा नियंत्रक अधिकारी यांना नोटीस बजावण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड येथे दुष्काळ सदृष्यस्थिती जाहीर करण्यासह आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३३) ११८५२४ (२३-०७-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयात सन २०१७-१८ मध्ये खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी असलेल्या गावामध्ये शासन निर्णय क्रमांक एस.सी.वाय-२०१७/प्र.क्र.२७०/म-७, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ नुसार दुष्काळ सदृष्यस्थिती जाहीर करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड जिल्हयातील १६ तालुक्यापैकी १० तालुक्यातील ११६८ गावांमध्ये दुष्काळ सदृष्यस्थिती जाहीर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नांदेड जिल्हयातील तालुक्यांमध्ये दुष्काळ सदृष्यस्थिती जाहीर करण्यासह आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-१०-२०१८) :** (१), (२) व (३) महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. एससीवाय-२०१७/ प्र.क्र.२७०/म-७ दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ व दिनांक २८ मार्च, २०१८ रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये सन २०१७-१८ च्या खरीप हंगामातील अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या राज्यातील एकुण १४६९१ गावांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आलेली नाही. परंतू सदर १४६९१ गावांमध्ये खालील उपाययोजना लागू करण्यास शासन मंजूरी देण्यात आली असून यामध्ये नांदेड जिल्हयातील अंतीम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या ११६८ गावांचा समावेश आहे.

१) जमीन महसूलात सूट
२) सहकारी कर्जाचे पुनर्गठन
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती
४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात ३३.५% सूट
५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी.
६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता
७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर
८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाडळी (ता.तासगांव, जि.सांगली) गावांमधील शेतीच्या हक्कात पुनर्वसन विभागाकडून 'टेंभू भूसंपादनासाठी' चे टाकलेले शेरे काढण्याबाबत**

**(३४) ११८६०४ (२३-०७-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाडळी (ता.तासगांव,जि.सांगली) गावांमधील शेतीच्या ७/१२ मध्ये १५ वर्षापुर्वी इतर हक्कात पुनर्वसन विभागाकडून 'टेंभू भूसंपादनासाठी' चे शेरे टाकलेले असल्याने शेतकऱ्यांना

त्यांच्या हक्काच्या जमिनींसंदर्भात निर्णय घेण्यास अडचणीं येत असल्याने सदरहू ७/१२ मधील शेरे काढून टाकण्यासाठी शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री, मा.महसूलमंत्री, विभागीय आयुक्त,पुणे यांचेकडे दिनांक २३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे मागण्या केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी लागणारी जमिन पुनर्वसन विभागाने यापूर्वीच ताब्यात घेतलेली असल्याने पाडळी येथील जमिनींवरील कालबाह्य झालेले शेरे काढून टाकण्यासाठी सांगली जिल्हा पुनर्वसन विभागाकडून मा.विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडे अहवालही सादर केलेला आहे, हेही खरे आहे क

(३) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) शेरे उठविण्यासंदर्भात दि. २५.६.२०१८ रोजी व त्यापूर्वी वैयक्तिक अर्ज प्राप्त झाले आहेत. याबाबत संबंधित अर्जदारांस दि. १८.७.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंधेरी पश्चिम (मुंबई) द्रुतगती महामार्गालगत गुंदवली येथील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या शेडचा जागेचा वापराबाबत

**(३५) ११८८६१ (०१-०८-२०१८). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी पश्चिम (मुंबई) द्रुतगती महामार्गालगत गुंदवली येथील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या शेडचा वापर झेरॉक्स, चहा, कुरियर एजन्सी या औद्योगिककारणांकरीता होत असल्याचे दिनांक १९ मे २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असुन एसटी निवाऱ्याच्या शेडचे बांधकाम व अन्य दुरुस्त्या स्थानिक विकास निधीमधून केले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी एसटी बसेस थांबत असून प्रवासी प्रवास करीत असुनही हा थांबा बेकायदेशीर आहे असा अहवाल सादर केला तसेच ही शेड भाडयाने देऊन बेकायदेशीररित्या एसटी महामंडळाच्या जागेचा वापर करुन दरमहा हजारो रुपये कमविले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या शेडच्या जागेचा वापर करण्यास परवानी देणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-१०-२०१८) :** (१) होय.

दि.१९.०५.२०१८ रोजी सदरबाबतचे वृत्त वर्तमानपत्रात व इतर माध्यमांद्वारे प्रसिध्द झाले होते. परंतू, अंधेरी पश्चिम (मुंबई) द्रुतगती महामार्गालगत गुंदवली येथील मार्गनिवारा हा म्हाडा प्राधिकरण यांच्या जागेत बांधला असून तो महामंडळाकडे अद्यापपर्यंत हस्तांतरित केलेला नाही. तसेच, महामंडळाचा तो अधिकृत थांबा नाही.

(२) व (३) सदर निवारा शेडवर राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस थांबत नाहीत. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा तालुक्यातील शेतकरी शेतीपयोगी अवजारांपासून वंचित राहिल्याबाबत**

**(३६) ११९४०९ (३१-०७-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा तालुक्यातील कृषी अधिकाऱ्यांनी विविध प्रकारच्या अनुदानित कृषी अवजारांसाठी लागणारे पूर्वसंमती पत्र न दिल्याने सुमारे २०० शेतकरी शेतीपयोगी अवजारांपासून वंचित राहिले असल्याचे दिनांक १७ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेरणीचे दिवस जवळ आल्याने बी बियांणाची जुळवा जुळव करावी की शेतीपयोगी अवजारे विकत घ्यावीत असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना शेतीपयोगी अवजारे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१८) :** (१) नाही.

(२) व (३) बुलढाणा तालुक्यात सन २०१७-१८ या वर्षात ट्रॅक्टरसाठी ३११ व इतर यंत्र औजारांसाठी ५२९ असे एकूण ८४० शेतकऱ्यांचे मागणी अर्ज प्राप्त झाले होते. शासकीय योजनांची अंमलबजावणी त्या-त्या वर्षात उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत करणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार, बुलढाणा तालुक्यासाठी सन २०१७-१८ या वर्षासाठी उपलब्ध अनुदान रु. ७४.९० लक्ष च्या मर्यादेत १२१ ट्रॅक्टर व २१३ इतर यंत्र औजारे अशा एकूण ३३४ शेतकऱ्यांना पुर्वसंमती देण्यात आली होती. त्यापैंकी २८ शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर व १०० शेतकऱ्यांनी इतर यंत्र/औजारे खरेदी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केला. सदर शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम रु. ७४.९० लक्ष जमा करण्यात आली आहे. उपलब्ध निधीच्या मर्यादेत पुर्वसंमती देण्याच्या धोरणाप्रमाणे कार्यवाही करण्यात आल्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांना अनुदान योजनेचा लाभ देण्यात आला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील शेतकरी तुषार संच घेऊन आर्थिक अडचणीत सापडले असल्याबाबत**

**(३७) ११९७२० (३१-०७-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सिंचन क्षमता वाढविण्यासाठी कृषी विभागाकडून तुषार संच खरेदीसाठी अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील शेतकरी तुषार संच घेऊन आर्थिक अडचणीत सापडले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, योजनेचे अनुदान रोखल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तुषार संच अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) आर्णी तालुक्यात सन २०१७-१८ च्या वर्षातील पुर्व संमती प्राप्त सुक्ष्म सिंचन संच बसविलेल्या सर्व ४९८ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम रु. ७०.९० लाख जमा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील दुष्काळग्रस्त गावांसाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(३८) ११९७५१ (३१-०७-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील ४४ मंडळामधील ७४८ गावात दुष्काळ पडल्यामुळे महसूल व वन विभागाने ही गावे दुष्काळग्रस्त म्हणून माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जाहिर केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हाधिकाऱ्यांनी दुष्काळग्रस्त गावांसाठी उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१८) :** (१) व (२) सन २०१७-१८ च्या खरीप हंगामातील अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील ७४८ गावांमध्ये महसुल व वन विभाग दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरून जिल्हाधिकारी,

बुलडाणा कार्यालयाकडून आदेश क्र. कावि/अका/जमाबंदी/ १३७/ २०१८ दिनांक १२ मार्च, २०१८ अन्वये खालील उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत.

१) जमीन महसूलात सूट

२) कृषी पंपाच्या चालू विजबिलात ३३.५% सूट

३) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी.

४) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर

५) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतक-यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

६) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती

७) सहकारी कर्जाचे पुनर्गठन

८) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले मोफत उच्च शिक्षणापासून वंचित राहिल्याबाबत**

**(३९) १२००६१ (३१-०७-२०१८). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हयाधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले मोफत उच्च शिक्षणापासून वंचित राहिल्याचे माहे एप्रिल-२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांचा शिक्षणाचा खर्च करणारी महत्वाकांक्षी योजना दादर (मुंबई) सिध्दिविनायक मंदिराने सुरु केली असतानाही आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांची यादी राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांनी न पाठविल्यामुळे केवळ १५ मुलांचेच अर्ज प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषी असणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले मोफत उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये याबाबत कोणती कार्यवाही केली वा वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१८) :** (१), (२) व (३) विधी व न्याय विभागाच्या दिनांक २१ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांसाठी श्रीसिध्दीविनायक शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेत अद्यापपर्यन्त ९ विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

नाशिक जिल्हयातील सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची २१ मुले/मुली भारतीय जैन संघटना, वाघोली, जि.पुणे येथे मोफत शिक्षण घेत आहेत. अहमदनगर जिल्हयातील मुला-मुलींची सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील यादी भारतीय जैन संघटना, वाघोली, जि.पुणे यांना पाठविण्यात आली आहे. धुळे जिल्हयातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला-मुलींची यादी धरती फाऊंडेशन, नाशिक यांचेकडे पाठविण्यात आली आहे.

पुणे जिल्हयातील आदिवासी शेतकऱ्यांच्या मुला-मुलींची यादी संबंधित संस्थांना पाठविण्यात आली आहे. अमरावती, यवतमाळ, बुलढाणा या जिल्हयातील शेतकरी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुला-मुलींची यादी जनता शिक्षण संस्था, वाई, जि.सातारा तसेच भारतीय जैन संघटना यांना पाठविण्यात आली आहे. जनता शिक्षण संस्था, वाई, जि.सातारा येथे जाण्यास इच्छूक मुलांची नावे प्राप्त न झाल्याने यवतमाळ जिल्हयाने या संस्थेस निरंक माहिती कळविली आहे. या संदर्भात स्वयंसेवी किंवा शिक्षण संस्थेने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्याची इच्छुकता व्यक्त केल्यास तेथे शिक्षणासाठी जाण्यास इच्छूक असलेल्या मुलांची नावे पाठविण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**संग्रामपूर (जि.बुलढाणा) तालुक्यात केळीबागांचे झालेले नुकसान**

**(४०) १२०११५ (३१-०७-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरखेड, सगोडा, वानखेड, दानापूर (ता.संग्रामपूर, जि.बुलढाणा) परिसरात भूगर्भातील जलपातळीत झालेली घट व अति उष्णता यामुळे केळीबागांचे नुकसान झाल्याचे दिनांक १७ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केळी उत्पादक शेतक-यांचे आर्थिक नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन केळी उत्पादक शेतक-यांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-१०-२०१८) :** (१) मे, २०१८ मध्ये भूगर्भातील पाणी पातळी ०.४ मिटरने खोल गेल्याचे निदर्शनास आले. मात्र त्यामुळे केळी बागा सुकून गेल्याचे निदर्शनास आले नाही.

(२), (३) व (४) नुकसान नसल्यामुळे अनुदान देण्याबाबत प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरपुर (जि.सोलापुर) बस स्थानकामध्ये प्रवाशांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४१) १२०९४२ (२३-०७-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपुर (जि.सोलापुर) बस स्थानकामध्ये प्रवाशांना पिण्याच्या पाण्यासाठी उपलब्ध असलेल्या चार टाक्यापैकी दोन टाक्यामधून कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे दिनांक ४ मे, २०१८ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे का,
(२) असल्यास, पंढरपुर येथील बस स्थानकातील पिण्याच्या पाण्याच्या असुविधेमुळे प्रवाशांना बाटलीचे पाणी विकत घ्यावे लागत असल्यामुले प्रवाशांचे आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पंढरपुर बस स्थानकामध्ये प्रवाशांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१९-१०-२०१८) :** (१) होय.
सदरची बाब निदर्शनास आल्यानंतर त्वरीत पाणीपुरवठा पुर्ववत करण्यात आला.
(२) व (३) दोन टाक्यामधून कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर पंढरपुर बसस्थानकावरील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा पुर्ववत करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येल्लोरी (ता.औसा, जि.लातूर) येथे गारपीट, वादळी वाऱ्यासह पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले नुकसान**

**(४२) १२१५३४ (२४-०७-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येल्लोरी (ता.औसा, जि.लातूर) येथे सन २०१७ मध्ये झालेल्या प्रचंड गारपीट, वादळी वारे व पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले असून सदर नुकसानीचा अहवाल सादर करण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांनी माहे,एप्रिल २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अप्पर मुख्य सचिव, मदत व पुनर्वसन यांना दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, लातूर यांनी सदर नुकसानीबाबत महसूल व कृषी विभागाने केलेल्या पंचनामा आधारे नुकसानीचा अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे व फळबागांचे नुकसान, तसेच हेक्टर जमिनीवरील बागायती व जिरायती पिकांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अहवालाच्या अनुषंगाने नॅशनल डिझास्टर रिलीफ फंड/स्टेट डिझास्टर रिलीफ फंडअंतर्गत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-१०-२०१८) :** (१) होय.
(२) हे अंशतः खरे आहे.
(३) लातूर जिल्हयातील औसा तालुक्यातील मौजे येल्लोरी येथे माहे मार्च २०१७ दरम्यान अवेळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीसाठी जिल्हाधिकारी, लातूर यांचा रु. ४४,७३,७५५/- एवढया निधीमागणीबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्या अनुषंगाने लातूर जिल्हयातील औसा तालुक्यातील मौजे येल्लोरी येथे माहे मार्च २०१७ दरम्यान अवेळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीसाठी बाधितांना नुकसानभरपाई देण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला येथील महाराष्ट्र पशुधन मंडळाच्या डाटा एन्ट्री ऑपरेटर पुरवठा कामाबाबत**

**(४३) १२१५५२ (२५-०७-२०१८). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथील महाराष्ट्र पशुधन मंडळाने डाटा एन्ट्री ऑपरेटर पुरवठा कामाचे कंत्राट सिनर्जीज सोल्युशन प्रा.लि. या अपात्र कंपनीला दिल्याची तक्रार श्री साई ई-सर्व्हिसचे संचालकांनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिनर्जीज सोल्युशन कंपनीने सन २०१५ ते २०१७ या दोन वर्षाचे पीटीआरसी चलान व कर न भरल्याचे उक्त तक्रारीच्या अनुषंगाने व्यवसाय कर विभागाच्या निदर्शनास आणून दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार अकोला येथील महाराष्ट्र पशुधन मंडळाने डाटा एन्ट्री ऑपरेटर पुरवठा कामाचे कंत्राट सिनर्जीज सोल्युशन प्रा.लि. या अपात्र कंपनीला दिल्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१२-१०-२०१८) :** (१) श्री साई ई-सर्व्हिसेस यांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ व आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांचे विरुध्द रिट पिटीशन क्र.७४७/२०१८ दाखल केली होती. सदर रिट पिटीशन दि.२३.०३.२०१८ रोजी न्यायालयाने खारीज केलेली आहे.

(२) सिनर्जीज सोल्युशन कंपनीने विक्रीकर विभाग, औरंगाबाद या कार्यालयाकडून प्राप्त झालेले सन २०१५ ते २०१७ या दोन वर्षाचे पीटीआरसी व पीटीईसी कर भरल्याचे प्रमाणपत्र महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ अकोला या कार्यालयास सादर केलेले आहे.

(३) व (४) होय.

सिनर्जीज सोल्युशन प्रा.लि.या कंपनीला अकोला येथील महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाने डाटा एंट्री ऑपरेटर पुरवठा कामाचे कंत्राट ई-निवीदा प्रक्रीया पारदर्शकरीत्या राबवुन देण्यात आले असल्यामुळे, कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इचलकरंजी येथे प्रादेशिक परिवहन विभागाचे उपप्रादेशिक कार्यालय स्थापन करण्याची मागणी**

**(४४) १२१९९९ (०१-०८-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातकणंगले व शिरोळ (जि.कोल्हापुर) तालुक्यांसाठी इचलकरंजी येथे प्रादेशिक परिवहन विभागाचे उपप्रादेशिक कार्यालय सन २०११ मध्ये निकषाप्रमाणे स्थापन करण्याची मागणी लोकप्रतिनिधी इचलकरंजी यांनी माहे जुन, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा. मुख्यमंत्री व मा. मंत्री परिवहन, राज्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिवहन आयुक्त यांचे अहवालानुसार कोल्हापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील सन २०१२ पर्यंतची नोंदणीकृत वाहनांची संख्या ८.६१ लाख इतकी प्रचंड असून त्यापैकी प्रस्तावित इचलकरंजी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अंतर्गत ३.८६ लाख आहे, तसेच सदरील ४ लाख वाहनधारकांना परिवहन कार्यालयाशी संबंधित किरकोळ कामांसाठी ३० कि.मी. दूर कोल्हापुर येथे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हातकणंगले व शिरोळ तालुक्यांसाठी इचलकरंजी येथे प्रादेशिक परिवहन विभागाचे उपप्रादेशिक कार्यालय स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रादेशिक परिवहन कार्यालय,कोल्हापूर यांचे मार्फत इचलकरंजी येथील शिबीर कार्यालयामध्ये नविन नोंदणी, शिकाऊ व पक्की अनुज्ञप्तीचे कामकाज आठवड्यातून ४ दिवस करण्यात येते. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय कोल्हापूर या कार्यालयात वाहन ४.० व सारथी ४.० ही संगणक प्रणाली कार्यान्वीत करण्यात आली असून त्याद्वारे ऑनलाईन शुल्क स्विकारले जाते.

(३) शासन निर्णय क्र. एमव्हीडी-०८१५/प्र.क्र.२३३/परि-४, दि.१८.०६.२०१८ अन्वये मोटार वाहन विभागांतर्गत नवीन कार्यालय निर्मितीसाठी खालील निकष विहित केले आहेत.

अ) एखाद्या जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन जिल्हा निर्माण झाला असेल तर या नवीन जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रामध्ये नवीन परिवहन कार्यालयाची स्थापना करावी. इतर कोणत्याही परिस्थितीत नवीन कार्यालयाची स्थापना करु नये.

ब) ज्या जिल्ह्यांची लांबी जास्त आहे अशा जिल्ह्यांमध्ये जनतेच्या सोईसाठी नवीन परिवहन कार्यालय उघडण्याऐवजी वाहन चालक चाचणी केंद्र तसेच वाहन तपासणी व परिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत.

उपरोक्त निकषांनुसार इचलकरंजी येथे नविन परिवहन कार्यालय स्थापन करता येणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) येथील मासे विक्रीसाठी परवाने मिळण्याबाबत**

**(४५) १२२१२७ (३१-०७-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील कोळी महिलांनी उदरनिर्वाहासाठी कायमस्वरुपी मासे विक्रीस परवाने मिळण्याबाबत शासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मासे विक्रीसाठी परवाने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२५-१०-२०१८) :** (१) होय.

(२) वसई मासळी मार्केटमध्ये मासे विक्रीसाठी देण्यात येणारे परवाने हे स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत देण्यात येतात. मासे विक्रीसाठी देण्यात येणारे परवाने हे मत्स्यव्यवसाय विभागामार्फत दिले जात नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यात राष्ट्रीय कृषी विस्तार व तंत्रज्ञान अभियानांतर्गत खरेदी केलेल्या ट्रॅक्टरला अनुदान देण्याबाबत**

**(४६) १२२१२८ (२४-०७-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात राष्ट्रीय कृषी विस्तार व तंत्रज्ञान अभियानांतर्गत खरेदी केलेल्या ट्रॅक्टरचे अनुदान देण्यास संबधीत जिल्हा कृषी अधिक्षक, चंद्रपूर यांचकेकडून दुर्लक्ष केले जात असल्याचे दिनांक ११फेब्रुवारी,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कृषी अधिक्षक यांनी मर्जीतील शेतकऱ्यांना ट्रॅक्टर मंजूर करून, त्यांनी खुल्या बाजारातून खरेदी केलेल्या ट्रॅक्टरचे अनुदान शेतकऱ्यांना देण्यात आल्याबाबतची तक्रार येरगांव येथील शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या कृषी अधिक्षकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१८) :** (१) नाही.
(२) व (३) सन २०१५-१६ मधील प्रचलित शासकीय धोरणानुसार, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ या शासनाच्या एकमेव पुरवठादार संस्थेकडून खरेदी करणे आवश्यक होते. तथापि, येरगाव, ता. मूल, जि.चंद्रपूर येथील काही शेतकऱ्यांनी त्यांना मंजूर केलेल्या मॉडेलचे ट्रॅक्टर खरेदी न करता दुसऱ्याच मॉडेलचे ट्रॅक्टर खुल्या बाजारातून खरेदी केल्यामुळे त्यांना अनुदान अनुज्ञेय ठरत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शेगाव (जि.बुलढाणा) तालुक्यात ठिबक व तुषार संचाच्या पात्र लाभार्थ्यांना अनुदान न मिळाल्याबाबत**

**(४७) १२२६८२ (३१-०७-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेगाव (जि.बुलढाणा) तालुक्यात ठिबक व तुषार संचाच्या अनुदानासाठी पात्र असलेल्या शेतक-यांना अनुदान न मिळाल्याने जलम माटरगांव सर्कलच्या जवळपास ५० शेतक-यांनी शेगांव तहसिल कार्यालयासमोर उपोषण केल्याचे माहे मे २०१८ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठिबक व तुषार संचाच्या पात्र लाभार्थ्यांना अनुदान मिळण्यासाठी तसेच उपोषणकर्त्यांच्या उपोषणाची दखल घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-१०-२०१८) :** (१) होय.
(२) शेगाव (जि. बुलढाणा) तालुक्यातील पुर्वसंमती प्राप्त १,३८५ शेतकऱ्यांपैकी सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केलेल्या सर्व ६८४ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पेण (जि.रायगड) तालुक्यातील संरक्षक बंधाऱ्याच्या दुरुस्तीबाबत**

**(४८) १२४००३ (२४-०७-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील ढोंबी-चिर्बी, खारमाचेला खारभूमी योजनेतील फुटलेल्या समुद्र संरक्षक बंधाऱ्याच्या दुरुस्तीची जबाबदारी खारभूमी विभागाची असल्याचे माहे एप्रिल,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संरक्षक बंधा-याच्या दुरुस्तीकरिता निधीची तरतूद केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त संरक्षक बंधा-याच्या दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-१०-२०१८) :** (१) होय.

(२) सदर बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम जेएसडब्ल्यू कंपनीने करण्याचे मान्य केले असून पावसाळयापूर्वी २५ मी. लांबीच्या खांडीचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. उर्वरित काम संबंधित कंपनीने पावसाळयानंतर पूर्ण करण्याचे मान्य केले आहे. कंपनीने काम पूर्ण केल्यानंतर योजना सुस्थितीत राहण्यासाठी काही कामे करणे आवश्यक असल्यास सदर कामे शासन निधीतून पूर्ण करण्यात येतील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अर्धापूर (जि.नांदेड) येथील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(४९) १२४६३८ (०१-०८-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्धापूर (जि.नांदेड) येथे मागील चार वर्षापासून दुष्काळ परिस्थती असल्याने शेती व्यवसाय अडचणीत आला असून तेथील पाण्याच्या पातळीत झपाटयाने घट झाल्याने शेतीचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने येथील शेतक-यांना मदत देणारे आर्थिक पॅकेज जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-१०-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्याचे एकूण वार्षिक पर्जन्यमान ८६९.६० मि.मी. असून गेल्या चार वर्षात झालेले सरासरी पर्जन्यमान व खरीप पैसेवारीची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

सन २०१४-१५ मध्ये सरासरी पर्जन्यमान ३९३.६७ मि.मी झाले होते व खरीप हंगाम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी होती.

सन २०१५-१६ मध्ये सरासरी पर्जन्यमान ११४२.६७ मि.मी झाले होते व खरीप हंगाम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी होती.

सन २०१६-१७ मध्ये सरासरी पर्जन्यमान ४०१.९८ मि.मी झाले होते व खरीप हंगाम पैसेवारी ५० पैशांपेक्षा जास्त होती.

भूजल सर्वेक्षणानुसार पारडी, लहान, पिंपळगाव व मालेगाव येथील सरासरी पाण्याची पातळी अनुक्रमे ९.१०, ८.९०, १४.९० व १०.५५ एमबीजीएल ऐवढी असून त्यामध्ये गेल्या चार वर्षात सरासरी ०.५६, (-) २.२२, (-)२.७४ व (-) २.६५ ऐवढी घट झाल्याचे दिसून येते.

सन २०१७-१८ मध्ये सरासरी पर्जन्यमान ६८५.६६ मि.मी झाले होते व खरीप हंगाम पैसेवारी ५० पैशांपेक्षा जास्त होती.

(२) अर्धापूर (जि.नांदेड) तालुक्याची गेल्या चार वर्षातील पैसेवारी व पर्जन्यमानाच्या सरासरी बाबत अनियमितता पाहता गेल्या चार वर्षात बाधित शेतक-यांना खरीप हंगाम व अवेळी पाऊस, गारपीटमुळे झालेल्या पिक नुकसानीबाबत खालीलप्रमाणे अनुदान वाटप करण्यात आले आहे.

सन २०१४-१५ मध्ये रूपये १७,५६,०१,७२०/-

सन २०१५-१६ मध्ये रूपये १०,२३,२५,९३९/-

सन २०१६-१७ मध्ये रूपये १,०५,६०,३८०/-

सन २०१७-१८ मध्ये रूपये ९,२८,४९,९३३/-

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खानवटे (ता.दौंड, जि.पुणे) येथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासह निवासी भूखंड देण्याबाबत

**(५०) १२५६५२ (३१-०७-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानवटे (ता.दौंड, जि.पुणे) येथील तलांक ५०० ते ५०४ मधील सुमारे ७० कुटुंबांचे घरे शासन निर्णय क्र.३४९१/प्र.क्र.-९१/र-४ दि.०७/११/१९९४ नुसार संपादन झालेली असून सदर कुटुंबांना निवासी भूखंड मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच ठिकाणच्या उर्वरित १२८ घरांचे तलांक ५०४ ते ५०७ मधील पुनर्वसनासाठी जिल्हा पुनर्वसन कार्यालय, पुणे यांचेमार्फत पत्र क्र. जि.पु.अ/उजनी/वशी/१२९/२००० दि.२९/०१/२००१, कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांना पाठवण्यात आले असून त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नसून सदर कागदपत्रेच गहाळ झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्वसनापासून वंचित राहिलेल्या ७० कुटुंबाना निवासी भूखंड मिळणेबाबत व १२८ कुटुंबांची कागदपत्रे गहाळ झाल्यामुळे त्यांचे पुनर्वसन तातडीने करण्याची मागणी जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेकडे लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासह निवासी भूखंड देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) शेरे उठविण्यासंदर्भात दि. २५.६.२०१८ रोजी व त्यापूर्वी वैयक्तिक अर्ज प्राप्त झाले आहेत. याबाबत संबंधित अर्जदारांस दि. १८.७.२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.